# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

**५५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१३.१०.२०२६ जिल्हा: नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (०३/१०/२०२६ ते ०९/१०/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१४/१०/२०२६ ते १८/१०/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.८ | ३३.० | ३३.८ | ३३.४ | ३२.८ | ३२.७ | ३२.८ | कमाल तापमान (अं.से.) | ३५ | ३४ | ३५ | ३५ | ३५ |
| २३.५ | २४.० | २४.० | २२.३ | २३.८ | २२.७ | १९.८ | किमान तापमान (अं.से.) | १८ | १९ | २० | २१ | २३ |
| अं:ढगाळ | अं:ढगाळ | अं:ढगाळ | अं:ढगाळ | अं:ढगाळ | अं:ढगाळ | अं:ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | अं:ढगाळ | अं:ढगाळ | अं:ढगाळ | अं:ढगाळ | अं:ढगाळ |
| ७३ | ६६ | ७७ | ६२ | ६४ | ६८ | ६७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६१ | ६४ | ६६ | ६४ | ५८ |
| ६३ | ३७ | ४१ | ४३ | ४२ | ४२ | ४१ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३० | ३२ | ३१ | २८ | ३० |
| ३.७ | ४.४ | ४.९ | ४.२ | ५.८ | ६.१ | ४.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४.१ | ५.३ | ४.४ | ३.४ | ४.३ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात हवामान कोरडे राहील. आकाश पुढील पाच दिवस अंशतः ढगाळ राहिल. कमाल तापमान ३४-३५ डिग्री सें. व किमान तापमान १८-२३ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग ३-५ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान सतर्कता/इशारा:** | | इशारा नाही |
| **सामान्य सल्ला** | | जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी समाधानकारक पाऊस झालेला नाही तसेच मान्सून उशिरा सुरु होऊन वेळे आधीच परतल्यामुळे सद्यस्थितीत आपत्कालीन पीक नियोजन करणे अत्यावश्यक आहे म्हणून रब्बी हंगामात पिकाची निवड करण्यापूर्वी उपलब्ध पाण्याचा विचार करावा,पिकाची निवड करताना पिकाचा कालावधी (कमी कालावधीचे पिकांचे सुधारित वाण), त्यावर येणारे रोग व किड (किड व रोगप्रतिकारक्षम सुधारित वाण ) आणि करावयाच्या उपाय योजना याचा अभ्यास करावा. पाण्याचा ताण सहन करू शकणाऱ्या पिकाची आणि त्यांच्या वाणाची शक्यतो प्राधान्य क्रमाने लागवडीसाठी विचार करावा.<br>पाण्याची उपलब्धता असल्यास जिरायती हरभरा पेरणीचे नियोजन करताना हरभरा पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवाच्या २-३ पाळ्या देऊन शेत पेरणीस तयार ठेवावे. १५ ऑक्टोबर पर्यंत जिरायती हरभरा बीजप्रक्रिया करून पेरावा (२ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम बाविस्टीन / किलो बियाणे किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा व यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम / १० किलो बियाणे).शिफारशीत खत मात्रा पेरणीवेळी द्यावी. |
| **संदेश** | | **कोरडे हवामान लक्ष्यात घेता, परीपक्व झालेली खरीप पीकांची कापणी व मळणी पूर्ण करून घ्या आणि पिकांना उन्हात चांगले वाळवून सुरक्षित जागेवर साठवून ठेवावेत.** |
| **रब्बी ज्वारी** | पेरणी | जिल्ह्यात काही ठिकाणी समाधानकारक पाऊस झालेला नाही तसेच मान्सून उशिरा सुरु होऊन वेळेवर परतल्यामुळे सद्यस्थितीत आपत्कालीन पीक नियोजनच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सल्ला देण्यात येतो कि ज्वारीसारख्या भरड धान्य किंवा मिलेट्स वर्गातील कमी पाण्यात आणि हलक्या जमिनीत येणारे पौष्टिक पीक रब्बी हंगामात पेरावे.<br>पेरणीनंतर पाऊस पडल्यास पाणी जमिनीत मुरविण्यासाठी पेरणीनंतर सारा यंत्राने आडवे वाफे व दंड पाडावेत. या मूलस्थानी जलसंधारण तंत्रामुळे रब्बी ज्वारीच्या उत्पादनात ३०–३५% वाढ होते.<br>अधिक धान्य, कडबा व निव्वळ नफ्यासाठी पेरणीपूर्वी ज्वारीचे बियाणे ०.०५% पोटॅशियम नायट्रेट द्रावणात (५ ग्रॅम/१० लिटर पाणी) १०–१२ तास भिजवून, हेक्टरी ४० किलो नत्र व २० किलो स्फुरद या शिफारशीत खत मात्रेसह पेरणी करावी. पेरणीनंतर ५५ दिवसांनी २% पोटॅशियमची फवारणी करावी. (महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)<br>रब्बी हंगामात ज्वारीची पेरणी १५ ऑक्टोबर पर्यंत पावसाच्या ओलीवर ५ सें.मी. खोलीपर्यंत करावी. |
| **भात** | पोटरी ते फुलोरा /दाणे भरण्याची अवस्था | भात सदृश्य तणाची भेसळ फुलोऱ्यावर येताच लगेच काढावी जेणेकरून त्याचे दाणे खडून इतर स्वच्छ भात प्रक्षेत्रावर होणारा प्रसार थांबवता येईल.<br>उशिरा वाढलेली तणे काढून शेत स्वच्छ ठेवावे, जेणेकरून अन्नद्रव्यांची स्पर्धा कमी होईल.<br>पाणी व्यवस्थापन :<br>भात खाचरात पिकाच्या पोटरीच्या अवस्थतेत पाण्याची पातळी ५-१० सेमी असावी.<br>पाण्याची सोय नसलेल्या ठिकाणी १ % पोटॅशियम नायट्रेट (१३:००:४५) ची फवारणी घ्यावी. |
| **नाचणी/नागली व वरई** | पोटरी ते फुलोरा /दाणे भरण्याची अवस्था | जर पिकात करपा रोग आढळून आल्यास रोगाच्या नियंत्रणासाठीची डायथेन एम ४५, २५ ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावयाची.<br>लष्करी अळी व पाने खाणारी अळी : खरीपात ३० ते ८० टक्के नुकसान. गवताळ-डोंगरी भागात जास्त प्रादुर्भाव, बंदोबस्त: नाचणी पिकावरील पाने खाणारी अळीसाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बांधावरील गवत व तण उपटून नष्ट करावे. |
| **मका** | परिपक्वता / काढणी अवस्था | परिपक्व झालेल्या खरीप मका पिकाची कापणी सुरु ठेवावी. त्यासाठी कणसे पिवळसर, दाणे कडक झाल्यानंतर कणसे खुडून काढावीत. ही कणसे दोन ते तीन दिवस उन्हात चांगली वाळवावीत. त्यानंतर कणसाच्या वरील आवरण काढून मका सोलणी यंत्राच्या (म.फु.कृ.वि. राहुरीद्वारे विकसित सुधारित अवजार) साह्याने कणसातील दाणे वेगळे करावेत. दाण्यांतील पांढरी तुसे, बिट्ट्याचे तुकडे वेगळे करण्यासाठी उफनणी करावी. दाणे चांगले उन्हात वाळवून दाण्यांतील आर्द्रता १२ टक्क्यांपर्यंत ठेऊन साठवण करावी. |
| **सोयाबीन** | शेंगा भरण्याच्या अवस्था ते पक्वततेची अवस्था | पाण्याची सोय असल्यास संरक्षित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भुईमुग** | शेंगा भरण्याची ते पक्वततेची अवस्था | पाण्याची सोय असल्यास संरक्षित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **बाजरी** | परिपक्वता / काढणी अवस्था | परिपक्व झालेल्या खरीप बाजरा पिकाची कापणी पूर्ण करून घ्यावी. त्यासाठी ताटाची कणसे विळ्याने कापून गोळा करावीत व वाळवून मळणी करावी.<br>खरीप बाजरा पिकाची मळणी यंत्राच्या सहय्याने लवकरात लवकर करावी. |
| **द्राक्ष** | | छाटणीपूर्व द्राक्षबाग व्यवस्थापन<br>छाटणीपूर्वी जमिनीत योग्य वाफसा व मुबलक सेंद्रिय पदार्थ असल्यास पांढऱ्या मुळ्यांची वाढ चांगली होते. या मुळ्यांद्वारे कॅल्शिअम व इतर अन्नद्रव्यांचे शोषण होऊन नवीन फुटींची वाढ आणि घडांच्या विकासासाठी आवश्यक सायटोकायनीनची उपलब्धता वाढते. त्यामुळे छाटणीनंतरच्या पहिल्या ७० दिवसांत मुळांच्या परिसरात तण राहणार नाही, याची काळजी घ्यावी.<br>पावसाची शक्यता कमी असताना ताग कापून बोदावर सेंद्रिय आच्छादन करावे. तागाच्या खोडाच्या परिपक्वतेनुसार सेंद्रिय कर्ब व नत्राचे प्रमाण बदलते, त्यामुळे खत व्यवस्थापन करताना त्याचा विचार करावा. तसेच उसाचे पाचट, बगॅस व काढलेली तणे आच्छादनासाठी वापरता येतात.<br>पाणी वापर कार्यक्षमता वाढविण्यासाठी सेंद्रिय आच्छादनावर ४ फूट रुंदीचे, २७ मायक्रॉन जाडीचे चंदेरी/काळे प्लॅस्टिक मल्चिंग पेपर अंथरावे. प्लॅस्टिकच्या कडा मातीने व्यवस्थित झाकल्यास आच्छादनाचे फायदे अधिक मिळू शकतात. |

## हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:igatpuri.amfu@gmail.com**


| | | |
|---|---|---|
| **डाळिंब** | | तेलकट डाग रोग व्यवस्थापन:<br>रोगास अनुकूल वातावरण असल्यास संध्याकाळी हायड्रोजन पेरॉक्साइड २ मि.लि./लिटर पाणी फवारावे. एक दिवसाच्या अंतराने कॅप्टन (५० डब्ल्यूपी) २ ग्रॅम + ब्रोमोपॉल ०.५ ग्रॅम/लिटर पाणी, नॉन-आयोनिक स्टिकरसह फवारावे. त्यानंतर चार दिवसांच्या अंतराने बॅसिलस सबटिलीस व स्यूडोमोनास फ्लूरोसन्स प्रत्येकी ५ मि.लि./लिटर पाणी या प्रमाणात संध्याकाळी फवारणी करावी. गरजेनुसार कॅप्टन २ ग्रॅम + पोटॅशियम सॉल्ट ऑफ फॉस्फरस ३ ग्रॅम/लिटर पाणी वापरता येईल. अनावश्यक फवारण्या टाळाव्यात व रोगप्रादुर्भावाच्या काळात नत्रयुक्त खतांचा वापर शक्यतो करू नये. |
| **आंबा** | | आंबा : जुन्या बागेचे पुनरुज्जीवन<br>उद्देश: जुन्या आंबा झाडांची योग्य छाटणी करून झाडांचा विस्तार मर्यादित ठेवणे, सूर्यप्रकाश व हवा खेळती ठेवणे आणि दर्जेदार उत्पादन वाढविणे. यामुळे फवारणी, फळकाढणी व आंतरमशागतीची कामे कमी खर्चात सुलभ होतात.<br>पुनरुज्जीवनाची गरज : पारंपरिक १० × १० मीटर अंतरावरील बागांमध्ये झाडांची अतिवाढ व दाटी झाल्यामुळे सूर्यप्रकाशाचा अभाव, रोग-किडींचा प्रादुर्भाव, लहान फळे आणि उत्पादनात घट दिसून येते.<br>पुनरुज्जीवनयोग्य झाडे :<br>दहा वर्षांपेक्षा अधिक वयाची व कमी उत्पादकता असलेली झाडे (दरवर्षी ५०–६० पेक्षा कमी फळे).<br>अतिदाट वाढलेली व आतील भागात सूर्यप्रकाश न पोहोचणारी झाडे.<br>२०० ग्रॅमपेक्षा कमी वजनाची फळे देणारी झाडे.<br>छाटणीचा योग्य कालावधी : ऑक्टोबर महिन्यात छाटणी करावी. जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास नवीन पालवी निरोगी व जोमदार येण्यास मदत होते. छाटणीनंतर नवीन पालवीचे योग्य व्यवस्थापन करून रोग व किडींपासून संरक्षण करावे. |
| **खरीप कांदा** | रोपवाटिका व्यवस्थापन | कांदा पिकातील तण नियंत्रणासाठी लागवडीपासून २१ दिवसांनी रासायनिक तणनाशकाची फवारणी करावी. फवारणीवेळी शेतामध्ये वापसा स्थिती असावी याची काळजी घ्यावी.<br>कांदा पीक एक महिन्याचे झाल्यावर नत्र खताचा पहिला हफ्ता द्यावा. |
| **टोमॅटो** | | रब्बी टोमॅटो रोपवाटिका<br>रब्बी हंगामासाठी सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये रोपवाटिका तयार करून ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये पुनर्लागवड करावी.<br>एक एकरासाठी सरळ वाण १६० ग्रॅम व संकरित वाण ५० ग्रॅम बियाणे पुरेसे आहे.<br>बियाण्यास थायरम/कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम + ॲझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.<br>एक एकरासाठी सुमारे १.२ गुंठे रोपवाटिका पुरेशी असून ३ × १ मीटर, १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत.<br>प्रति गादीवाफा ५ किलो कुजलेले शेणखत + १९:१९:१९ (८० ग्रॅम) किंवा १५:१५:१५ (१०० ग्रॅम) + २०० ग्रॅम निंबोळी पेंड + ५० ग्रॅम ट्रायकोडर्मा मिसळावे.<br>१० सें.मी. अंतरावर ओळी व १ सें.मी. अंतरावर बी पेरावे. उगवणीपर्यंत हलके पाणी द्यावे व पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी.<br>रोपे उगवल्यानंतर ६०–१०० मेश नायलॉन नेटने झाकून संरक्षण करावे.<br>साधारण २५–३० दिवसांत रोपे पुनर्लागवडीसाठी तयार होतात. |
| **पशुधन (गाय व म्हैस)** | | पशुधन संरक्षण व चारा व्यवस्थापन<br>चारा साठवणूक व मुरघास निर्मिती: हिरव्या चाऱ्याची टंचाई भासल्यास मुरघास (Silage) तयार करून साठवणूक करावी. ऊस, मका किंवा कडबा यांची कुट्टी करून जनावरांना द्यावी, त्यामुळे चाऱ्याचा अपव्यय टाळता येतो.<br>युरिया-कडबा प्रक्रिया: वाळलेल्या चाऱ्याची किंवा कडब्याची पौष्टिकता वाढविण्यासाठी शिफारशीनुसार युरिया प्रक्रिया करावी.<br>खनिज मिश्रणाचा वापर: जनावरांच्या आहारात योग्य प्रमाणात खनिज मिश्रणाचा समावेश करावा. खनिजांचा पुरवठा होण्यासाठी उपलब्धतेनुसार शेवग्याचा पाला योग्य प्रमाणात द्यावा.<br>चारा साठवणूक व वापर: उपलब्ध चारा कोरड्या व हवेशीर ठिकाणी साठवावा. ओलसर किंवा बुरशी आलेला चारा जनावरांना देऊ नये. हिरव्या चाऱ्याचा योग्य प्रमाणात वापर करावा आणि जनावरांच्या आहारात अचानक मोठा बदल करू नये.<br>पिण्याचे पाणी व उष्णतेपासून संरक्षण: जनावरांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सावलीत व्यवस्था करावी. उन्हापासून संरक्षणासाठी गोठ्याभोवती शेडनेट किंवा गोणपाटाचे पडदे लावावेत. |
| **शेळी** | | ऑक्टोबरमधील शेळ्यांतील व्यवस्थापन<br>माज ओळखणारा बोकड गोठ्यापासून वेगळा व दूर ठेवावा.<br>पैदाशीच्या योग्य नोंदी ठेवाव्यात.<br>पैदाशीच्या माद्यांमध्ये परजीवींचे प्रमाण तपासावे व आवश्यकतेनुसार जंतनिर्मूलन करावे.<br>शेळ्यांचे वाढलेले खूर कापून घ्यावेत. |
| **मेंढी** | | ऑक्टोबर महिन्यातील मेंढ्यांचे व्यवस्थापन<br>मेंढ्यांच्या लेंडीचे नमुने तपासून पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार जंतनाशक औषध द्यावे.<br>पैदाशीसाठी अनुपयुक्त नर मेंढ्यांचे खच्चीकरण करावे.<br>मेंढ्यांच्या वाड्यातील मातीचा थर बदलून स्वच्छता व कोरडेपणा राखावा.<br>बाह्य परजीवींच्या नियंत्रणासाठी पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार योग्य गोचीडनाशक द्रावणाने मेंढ्यांवर उपचार करावेत.<br>मेंढ्यांची लोकर योग्य पद्धतीने कातरावी.<br>निरुपयोगी व कमी उत्पादक मेंढ्या कळपातून वेगळ्या करून विक्री करावी.<br>सकाळी व संध्याकाळी तापमानातील बदलांपासून मेंढ्यांचे संरक्षण करावे. |
| **कुक्कुटपालन** | | कोंबड्यांमधील ताण व उपाययोजना<br>ताण येण्याची कारणे: अचानक हवामान बदल, असंतुलित आहार, अपुरे खाद्य सेवन, वजनातील बदल, पिसे गळणे, वयात येणे, हाताळणी, वाहतूक व औषधोपचारांमुळे कोंबड्यांमध्ये ताण निर्माण होऊन रोगप्रतिकारशक्ती कमी होऊ शकते.<br>उपाययोजना:<br>उपलब्ध जागेनुसार कोंबड्यांची योग्य संख्या ठेवून गर्दी टाळावी.<br>शेडमधील लिटर स्वच्छ व कोरडे ठेवावे आणि अमोनियाची निर्मिती कमी करण्यासाठी योग्य वायुवीजन राखावे.<br>हवामानानुसार शेडचे पडदे व्यवस्थापन करावे.<br>संतुलित आहार व स्वच्छ पाणी द्यावे. जीवनसत्त्वे व ताण कमी करणारी औषधे पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्ल्याने द्यावीत.<br>कोंबड्यांवरील ताण कमी झाल्यानंतरच लसीकरण करावे. |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान: ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी

**दिनांक** : १३.१०.२०२६

**स्वाक्षरीत/-**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**